# पटेल कला, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे गरताड गावात सात दिवसीय शिबिराला सुरुवात



**(दैनिक पोलीस शोध वृत्त) शिरपूर प्रतिनिधी** - येथील आर. सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विशेष हिवाळी शिबीर ५ फेब्रुवारी २०२४ ते ११ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान गरताड येथे संपन्न होत आहे.

या शिबिराचे उद्घाटन ५ फेब्रुवारी २०२४ रोजी गरताड येथे शिबिराचे उद्घाटन सरपंच सौ. सुनंदाबाई नथ्थु ठाकरे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सौ. मनिषाताई मनोहर ठाकरे, के. एस. मराठे, करण सुधिर शिंदे, राकेश साहेबराव सोनवणे, महेंद्र दत्तात्रय शिंदे, अशोक दिनकर सोनवणे, सारिश हंबिरराव सोनवणे, रविंद्र काशिनाथ कोळी, इतर ग्राम पंचायत सदस्य, प्रा.अपर्णा जगताप, प्रा. कामिनी चौधरी, प्रा. कविता सिसोदिया, प्रा. सुरेखा कुरणकर व मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव यांनी भुषविले.उद्घाटनपर भाषणात सारिश हंबिरराव सोनवणे यांनी देश सेवा, राष्ट्रप्रेम, साधी राहणी, जीवनातील दिनचर्या, प्रगती, व्यसनमुक्ती आणि मेहनत या विषयी मार्गदर्शन केले तसेच श्रम संस्कार कसे रुजविले जातात हे सांगितले. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व पटवून दिले तसेच या शिबिराचे काही निवडक अनुभव देखील विद्यार्थ्यांना सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.अनिता जाधव यांनी केले. प्रास्ताविक राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. रामकुमार सूर्यवंशी यांनी केले तसेच पाहुण्यांचे आभार प्रा. गोपाल बीडे यांनी व्यक्त केले.शिबिरासाठी प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम.पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. डी. जाधव यांनी शुभेच्छा दिल्या.

Programme officer
National Service Scheme
.C. Patel Arts, Com. &Sci. Colle...
Shirpur, Dist. Dhule

**प्रा.आर.एम.सूर्यवंशी**

रासेयो कार्यक्रम अधिकारी

N.S.S.